# नरभक्षक वाघ

नरडी नरभक्षक वाघाला पकडण्यासाठी, सापळा लावला जंगलात
आमिष म्हणून शेळीला, बांधून ठेवले पिंजऱ्यात ॥
मदोन्मत्त वाघ रक्ताला चटावला होता ।
गाफीलपणाने अलगद पिंजऱ्यात शिरला होता ॥
मोठ्या आश्चर्याने त्याने, विचारले पिंजऱ्यातील शेळीला, ।
"माझे क्रूर, रौद्र रूप पाहून कसे वाटते तुला ॥
नजरेतील विखाराने माझ्या, सारे गलितगात्र होतात ।
माझ्या जागी त्यांना प्रत्यक्ष यमराजच दिसतात ॥
आजपर्यंत असंख्य प्राणी मी सहजपणे मारली आहेत ।
जगण्याची केविलवाणी धडपड निर्विकारपणे पाहिली आहे ॥
पण डोळ्यात तुझ्या भीतीचा लवलेश ही नाही ।
जीवाचा आकांत नाही, प्रतिकाराचा आवेश ही नाही" ॥
शेळीने स्थिर शांत नजरेने वाघाकडे पाहिले ।
"बरे झाले वाघा, तूच मला विचारले ॥
अरे, निष्ठूरतेने निष्ठूरतेला कधीच जिंकता येत नाही ।
विखाने विखाला कधीच विझवता येत नाही ॥
तलवारीचा घाव ढालीवर झेलावा लागतो ।
शांती अन प्रेमाने क्रोध जिंकावा लागतो ॥
अरे, माझ्या एकटीच्या मरण्याने कित्येकांना जीवदान मिळेल ।
जन्माचे सार्थक होईल, श्रेष्ठ माझे बलीदान ठरेल" ॥
शेळीचा फडशा पाडतांना वाघ मनात गडबडला होता ।
निर्घृणतेच्या चेहऱ्यावर एक ओरखडा पडला होता ॥
कथा शेळी अन् वाघाची, हे एक रूपक आहे ।
दुसऱ्याला सुख देण्यातच आपलेही खरे सुख आहे ॥

सौ शोभा पांडे
गुरुगणेशनगर कोथरुड पुणे


Swapna